प्रसाद मग काय तो जरि निवारिना लाघवा ।
कसे दशमुखानुजा विसरला अहो राघवा ॥

आमचे लघुत्व जाऊन उन्नति होणार नाहीं, तर मग तुझा प्रसाद तो काय? उपसंहारात एकंदरींत आपली इच्छा काय ती सांगतात.

सुसंगति सदा घडो, सुजन वाक्य कानीं पडो ।
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ॥
सदंघ्रि कमळीं दडो, मुरडितां हटानें अडो ।
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो ॥
न निश्चय कधीं ढळो, कुजन विघ्नबाधा टळो ।
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्त मार्गीं वळो ॥
स्वतत्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो ।
पुन्हां न मन हें मळो, दुरित आत्मबोधें जळो ॥

असें मागणें मागून अत्यंत आर्तस्वरानें धावा करितात—

दयामृतघना अहो हरि, मला मयूराकडे ।
रडे शिशु, तयासि घे कळवळोनि माताकडे ॥
असा अतिथि धार्मिकस्तुतपदा कदा सांपडे ।
तुम्हां जड भवार्णवीं उतरितां न दासा पडे ॥

येथें मयूरोक्ति संपली. आतां काव्याच्या साधारण गुणाविषयीं थोडक्यांत पाहूं.

एखाद्या गोष्टीसंबंधानें तत्त्वदृष्टीनें आधीं विचार करून, योग्य कारणें देऊन, नंतर काव्य दृष्टीनें त्याविषयीं कल्पना केलेल्या अनेक ठिकाणीं आढळतात.

तुम्हीं दयाळू आहा, तेव्हां अपराध क्षमा करा म्हणून

**दवाग्नि जठरी अतिक्षुधित, त्यास हें अन्न द्या ।**

अशी कल्पना केली आहे.

मी अपराधी खरा. मला चांगली स्तुतिही करतां येत नाहीं, तरी तुम्हीं मला शिकवून चांगल्या मार्गास लावा असे म्हणून सत्राजिताची कन्या, जांबवती, कुब्जा, याचा स्वीकार कसा केलात असे विचारले आहे.

आयुष्य नश्वर आहे, तेव्हा तुम्हीं आतांच या असे म्हणून पुढे म्हणतात, मरणसमयीं हाक मारली असतां आपणास घाईने एकटेंच धावावें लागेल.

वाटेल तशा पाप्यासही तुझी कथा सुलभ हें सांगून नंतर कथा मोहिनी तुलाही भुलविते म्हणून ती तुजपेक्षां श्रेष्ठ असे म्हटले आहे.

हरिहरांत भेद नाहीं, असें स्पष्ट मत दिलेच आहे. पण ' हरा परिस तूं वरा ' कारण तो एकदांच विष प्यायला, पण तूं स्तुतिरूप प्रसिद्ध विष सदा पितोस अशी अर्थपूर्ण व रम्य कविकल्पनाहि आढळते.

आधीं योग्य कारणें न देतां नुसत्या कविकल्पनाच असत्या, तर तें योग्य झाले नसते. कविता म्हणजे नुसती कल्पना, त्यांत सत्याचा विचार मुळींच नसतो, असा कित्येकांचा आक्षेप असतो. निदान येथें तरी तसा प्रकार नाहीं; म्हणजे खरीं कारणें व कविकल्पना अशी दोन्हींही यांत आहेत.

सर्व केकावलीभर पुराणांतील कथा आल्या आहेत. पण कोणतीही कथा सविस्तर न सांगत बसतां नुसता उल्लेख करून बाकी वाचकावर सोपविलें आहे. त्यामुळें पुराणांतील कथांची माहिती नसलेल्या मनुष्यास केकावलींतील बरीचशी गोडी कदाचित् कळणार नाहीं.

पंताची विद्वत्ता व केकावलीचा विषय पहातां, भाषेंत जरी कठीण शब्द व मोठे समास आले आहेत, तरी त्यामुळें एकंदरींत विचारांत जास्त प्रौढता व गंभीरपणा आला आहे; कांहीं ठिकाणीं मात्र अर्थ फार थोडा व साधा असून संस्कृत शब्दामुळें कविता बरीच कठीण झालेली आढळते.

इतके सर्व गुण आहेत, तरी एका मोठ्या दोषाकडे नजर गेल्याखेरीज राहत नाहीं. तो दोष म्हणजे कित्येक ठिकाणीं शृंगाररसाचा अतिरेक. भक्तीच्या काव्यात शृंगाररस योग्य तऱ्हेनें आला असता कवितेस ज्यास्ती गोडी येते, यात शंका नाहीं व हे तुकारामाचे विराण्याचे अभंग, मिराबाईचीं काहीं पदे व भजनात गौळणी म्हणून जीं पदें असतात त्यापैकीं कांहीं वरून उघड दिसून येतें. केकावलींतही कित्येक ठिकाणीं या रसाची योजना उत्तम तऱ्हेने झाली आहे व त्यामुळे काव्यास अधिकच शोभा आली आहे.

उदाहरणार्थ——

१. दिलें बहु बरें खरें परि गमे कृपा व्यंग ती ।
अलंकृतिमती सती मनिं झुरे न जों संगती ॥

२. प्रतिक्षण नवीच दे रुचि शुकादि संन्यासिया ।
न मोहि ति भवत्कथा अरसिका अधन्यासिया ॥ १॥

३. कथा भुवन मोहिनी अशी न मोहिनी होय ती ।
हरो असुरधी हिणें भुलविलें किती हो यती ॥
नव्हे न म्हणवे असो जरि विमोहिला दक्ष हा ।
प्रिया वसविली शिरीं मुनिपथीं कसा दक्ष हा ॥ २८

४. सुरासुरनरोरगां भुलवुनी कथा न त्यजी ।
न भेद करि पंक्तिचा अमृत पाजि ती सत्य जी ॥
तिण जरि सुधारस स्वरत मानसां पाजिला ।
वधी अमृत घोटितां द्रव तयेचि वापा जिला ॥ ३॥

परंतु कांहीं ठिकाणीं या रसाची योजना अगदीं अयोग्य झाली आहे. या सर्वांचें विवेचन न करितां ज्याप्रमाणें विषाच्या बाटलीवर तांबडी चिठ्ठी लावतात त्याप्रमाणें त्या दोषांच्या स्थळांचा नुसता नामनिर्देशच केलेला बरा. तीं स्थळें ७, २४, ८३, १०१, १०२, ह्या श्लोकांत आढळतील.

पताच्या या काव्यांत हा दोष आहे व खरोखर जो दोष आहे तो गुणच म्हणून म्हणण्यात पतासारख्यासही मोठेपणा येत नाहीं. कारण असली स्तुति स्वतः पंतांसारख्यांसही आवडली नसती. योग्यायोग्य दृष्टीने आपल्या कृतीचे गुणदोषविवेचन व्हावे, अशीच सत्पुरुषांची इच्छा असते. असो. मी दाखविले यापेक्षा जास्त गुण या कवितेत नाहींत असे मला वाटत नाहीं. याकरिता माझे दुसरे कोणी बंधूही यासंबंधीं प्रयत्न करतील अशी आशा आहे.

# श्रवणाचा [ वाचनाचा ] उद्देश.

( लेखकः—**नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे** )

( १ ) जीवितार्थ अन्न ग्रहण करावें; सद्विचारार्थ जीवितसंरक्षण करावे आणि सदाचारार्थ सदोदित सद्विचार करीत जावा. अर्थात् मननपूर्वक नित्यानित्यवस्तुविवेकाच्या दृढ अभ्यासबलाने नित्यवस्तुनिश्चय करून सहजत्वें अवसायात्मिका म्हणजे अनंत अनित्य वस्तुनिश्चयात्मिका असलेल्या बुद्धीस व्यवसायात्मिका ( सदेकवस्तुपर ) करणे, ह्यातच नरजन्माचे सार्थक आहे. ह्याच हेतूने साधन-चतुष्ट्यात नित्यानित्यवस्तुविवेकाला आद्यस्थान दिलें आहे. तो न केल्यास नरजन्म पशुतुल्यच होतो.

( २ ) नित्यानित्यवस्तुविवेकपूर्वक बुद्धि सन्निश्चयात्मिका ( व्यवसायात्मिका ) झाली, म्हणजे तिला सहजच अनित्य असलेल्या सकल इहामूत्रफलभोगाविषयीं विराग उत्पन्न होतो. ह्यास्तव साधनचतुष्टयांत इहामूत्रफलभोगविरागास नित्यानित्यवस्तुविवेकाच्या पुढचें द्वितीय स्थान दिलें आहे. ह्या इहामूत्रफलभोगविरागाची प्राप्ति झाली, म्हणजे बुद्धीचे कार्य संपतें; आणि तें संपलें म्हणजे त्याच्या पुढील शमदमादि-षट्क नामक आचारात्मक तृतीय साधनास आरंभ होतो.

( ३ ) ह्या तृतीय साधनांचीं अंगें सहा आहेत, तीं अशीः—**शम** हें प्रथमअंग आहे, आणि **अंतरिंद्रिय-निग्रह** असा त्याचा अर्थ आहे. प्रायः ह्याच्याच बळानें **दम** नामक **बाह्येंद्रियनिग्रहरूपी** अंगाचा लाभ होतो, ह्यास्तव **" मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः । बंधाय विषयासक्तं मुक्तं निर्विषयंमनः "** ह्या सिद्धातान्वये **" आधीं मन मुंडा बा मन मुंडा "** असा संतोपदेश आहे. **" मन गया तो जाना दे, मत जाना दे शरीर। ना खेचे कमान तों कहां लगेगा तीर ॥ "** ह्या श्री कबीरोक्तींतही बलात्कारानें अंतरिंद्रियनिग्रह करण्याचाच उपदेश आहे. अशा प्रकारें सकल बाह्याभ्यंतरेंद्रियांचा पूर्ण निग्रह झाला, म्हणजे **तितिक्षा** नामक

तृतीय अंगाचा सहजच लाभ होतो. **तितिक्षा** म्हणजे शरीरेंद्रियाना सुखदुःख-प्राप्तिद्वारा होणाऱ्या हर्षशोकामुळें मनाची एकाग्रता विघडूं न देतां त्याची **ब्रह्मैकाग्रता (आत्मैकाग्रता) कायम राखणें** असा अर्थ आहे. ह्या **तितिक्षा** नामक तृतीय अंगाचेच फल **उपरति** नामक चतुर्थ अंग होय, आणि देहें-द्रियाना होणाऱ्या सुखदुःखांचा तितिक्षेच्या अभ्यासबलाने मनाला कदापि भासहि न होणें, असा उपरतीचा अर्थ आहे **समाधान** हे ह्या तृतीय साधनाचें पाचवें अंग आहे आणि निजानंदाचा भंग न होणें, असा **समाधान** ह्या शब्दाचा अर्थ आहे. ह्याच्या पुढील सहावें अंग **श्रद्धा** हें आहे, व साध्य वस्तूच्या विषयीं गुरुवचनावरील अचल निष्ठा, असा **श्रद्धा** ह्या शब्दाचा अर्थ आहे. हीं शडगे मिळून **शमदमादिषट्क** नामक तृतीय साधन होतें.

( ४ ) साधनचतुष्टयांतील उपरिनिर्दिष्ट तीन साधनांच्या पुढील कलश-स्थानीं असलेलें चतुर्थ साधन **मुमुक्षा** हें होय; आणि अखंड जीवब्रह्मैक्य भावनेची तीव्र इच्छा होणे, हें तिचे स्वरूप आहे.

हीं सकल साधनें एकाच जन्मांत प्राप्त होतात असा नेम नाहीं, इतकेंच नव्हे,तर **"मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये"** ह्या भगवदुक्तीप्रमाणें सिद्धावस्था म्हणजे **सर्वारंभपरित्याग** प्राप्त करून देणाऱ्या साधन चतुःष्टयाकडे प्रायः कोणत्याहि जिवाची मुळीं प्रवृत्तीच होत नसल्याकारणानें हें सारें जड जग सदोदित मायामोहांतच गुंग होऊन राहात असतें, अर्थात् खऱ्या जाग्रतीचा लाभ व्हावा, अशा सत्य कामाचा उद्भव क्वचित् जिवाच्या हृदयांत होतो; आणि सुदैवानें तो झाल्यावर

**जन्मांतर सहस्रेषु तपो ध्यानसमाधिभिः ॥**
**नराणां क्षीणपापानां कृष्णे भक्तिः प्रजायते ॥**

ह्या महाभारतरत्नोक्तीप्रमाणें अकर्मे व विकर्मे ह्या सर्वांचा त्याग करून केवल **यज्ञार्थ** म्हणजे यज्ञरूपी भगवान् जनार्दन वासुदेवाप्रीत्यर्थ अनंत जन्मीं केलेल्या तपादि समाध्यंत कर्मांनीं हृदयामध्यें शेवटीं सकल श्रुतिसाररूपी

परमात्म्याविषयीं परमप्रेमरूपी भक्ति उत्पन्न होऊन जिवाला सिद्धावस्था प्राप्त होते. " **कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ॥** " ह्या भगवदुक्ती-चाहि हाच अर्थ आहे.

साधनचतुष्टयांतील तीव्र मुमुक्षा नामक जें अंतिम साधन आहे, तें प्राप्त झाले म्हणजे पूर्वीच्या अनंत जन्मातील कर्ममय सकल प्राग्साधनें सफल झालीं असे होऊन पुरुष " **सर्वभूतहिते रतः** " होतो; कारण त्याचा " **देहोऽहं** " हा मात्र नष्ट होऊन त्याच्या ऐवजीं " **जीवो ब्रह्मैव ना परः** " असा भाव उत्पन्न झालेला असतो, व आत्मरूप अविनाशी आहे, असा त्याच्या बुद्धीचा निश्चय झाला असल्याकारणाने त्याला मरणाची भीति मुळींच राहात नसून तो सदा सर्वदा सर्वावस्थात परोपकाररतच असतो. अशा प्रकारची बुद्धि असलेला पुरुष सहजत्वेच निस्पृह असल्यामुळें तो लौकिकव्यवहारत्यागी होऊन त्याला दुष्कृतिवान् पुरुषांची मुळींच भीड राहात नाहीं, ह्यास्तव तो त्यांच्या दुष्कृत्यांचा परिस्फोट निःशंकपणें करीत असतो, कारण तसें न केलें तर खरे " **सर्वभूतहित** " मुळींच साधणार नाहीं, अशी त्याची पक्की समजूत असते. त्याला फक्त एका सत्याचा मात्र अभिमान असतो; आणि त्याच्या बळावर तो असत्यास लाथा देण्यास मुळींच भीत नाहीं. सारांश, मिथ्या व्यवहारदृष्ट्या तो वेडा असतो, असें म्हटलें तरी चालेल. कारण ज्या जगांत एक दिवससुद्धा सत्यव्रतपरिपालन करितां येणें प्रायः अशक्य आहे, अशा जगाला त्याच्या सत्याभिमानमूलक निस्पृहतेची किंमत कळावी कशी ? आणि ती जगाला न कळल्यामुळें त्याचा तोटा तरी काय होणार ? कारण आपल्या परोपकाराची कोणत्याही प्रकारें फेड व्हावी, अशी त्याला मुळींच इच्छा नसून उलट तो जगास पूर्णपणें ओळखीत अस-ल्याकारणाने जगासंबंधीं आपले कर्तव्य यथाशक्ति करीत राहून आपणा-विषयींच्या जगाच्या वर्तनासंबंधीं " **हाती चलत चालसे अपने ॥ कुतरा भोंकत वा को भुंकवा दे** " असा उदासीनच असतो. " **मलायत्तं बलं पुंसाम्** " ह्या आयुर्वेदीयसिद्धांतील रहस्य ओळखून यथोक्ति स्थळीं असलेल्या कोणत्याही शब्दादिक जड वस्तूंना तो कदापिही त्याज्य मानीत नाहीं.

"**कोणी निंदा कोणी वंदा । आम्हां स्वहिताचा धंदा ॥**" अशा प्रकारे शुद्ध ब्रह्मात्मैक्य बुद्धीने त्याचा सर्व आचार घडत असतो; आणि सिद्धावस्थ प्राप्त झाल्यावर मोक्षप्राप्त्यर्थ "**मनेसहित वाचा काया । अवघें दिधलें पंढरिराया**" असा संकल्प केला असल्यामुळे त्याचा सर्व व्यवहार ईशार्पण बुद्धीने होत असल्याकारणाने त्याच्या अंत:करणात अहंकर्तृत्व भावना मुळींच नसते. अशा सर्व व्यवहारात "**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे**" ह्या ईश्वराच्या कर्महेतूचा त्याला कधींहि विसर पडत नसल्यामुळे "**मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास ॥ कठिण वज्रास भेदूं ऐसे । भले तरी देऊं ××× लंगोटी॥ नाठाळासी काठी देऊं माथा**" ह्या संतोक्तीप्रमाणें त्याचें आचरण सहजच घडत असते; कारण "**गुणागुणेषु वर्तते**" ह्या सिद्धांताप्रमाणे मुक्तावस्था प्राप्तीपर्यंत जगाच्या रजतमात्मक बुद्धिसंघार्शी त्याच्या सात्विकबुद्धीचा अखंड झगडा अपरिहार्यत्वेच चालू राहून जीवेशैक्य लाभानंतरहि ईश्वरात्मकतेनें तसेंच वर्तन पुढेहि देहपातापर्यंत होत जाणारच. ह्यास्तव सिद्ध आणि मुक्त हे दोघेही कर्मातीत असतात असा सिद्धांत ठरून त्यांच्या आचरणाला दूषण देणारे मूढ लोक ईश्वरास नांवें ठेवण्याच्या दोषास मात्र पात्र होतात; कारण त्या दोन्ही कोटींतील महात्म्यांच्या अंत:करणांत "**देहोऽहं**" ह्या भावनेस मुळींच थारा नसून त्यांचीं सर्व कर्में केवळ ईशनिर्मित प्रारब्धबलानें किंवा ईशप्रेरणेने ईशार्पणार्थ घडत असतात. अहंभव राहिल्यामुळें त्यांच्याकडून कोणत्याहि जिवाची बुद्धिपुर:सर हितहानि होण्याचा यत्किंचितहि संभव नसल्याकारणानें आपणाला कोणी शत्रु असेल, अशी भावना त्यांच्या स्वप्नींहि नसते. अर्थात् अंत:करणांतून द्वैतभावनेचें निर्मूलन झालें असल्यामुळें ते भीतिरहित झालेले असतात. कारण "**द्वितीयाद्भयं भवति**" असा भीत्युत्पत्तीविषयीं सिद्धात आहे. सारांश, "देहोऽहं" असा जो द्वैतमूलक अहंभाव असतो, तोच सकल दुराचरणात्मक पातकाला कारणीभूत होत असून तो नष्ट झाल्याशिवाय अद्वैतज्ञानप्राप्तिद्वारा मुक्तिलाभ होणें शक्य नाहीं, हा सिद्धांत श्री समर्थांनीं

"अहंभाव ज्या मानसीचा सरेना। तया ज्ञान तें अन्न पोटीं जिरेना॥"

ह्या आपल्या वचनाने जगास बजावून सांगितला आहे;त्यावरून असें सिद्ध होतें कीं, "मम" हा बंध सुटून "न मम" रूपी मुक्तता जोपर्यंत लाभली नाहीं, तोंपर्यंतची सकल पंडितमन्याची "क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे" त्याचप्रमाणें

"सदा सेवि आरण्य तारुण्य काळीं। मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं॥
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा। जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥"

असा जो "आधीं केलें मग सांगितलें" म्हणणाऱ्या श्री. समर्थांनीं साधकाला स्वानुभवमूलक उपदेश केला आहे, त्यातील रहस्यहि असें आहे कीं, वेश्यासदने आणि मद्यगृहें जितकीं सामान्य जनांना त्याज्य आहेत, तितकींच असत्यभाषणमय जनसंसदि साधकाला त्याज्य आहे. ह्या जनसंसदीचा त्याग करणे प्रायः अशक्य असल्यामुळें जगाची

"मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये॥"

अशी हीनदीन स्थिति झाली आहे, ह्यांत मुळींच आश्चर्य नाहीं!!!

जनसंसदीचा त्याग करण्यास अलौकिक सामर्थ्य अथवा प्रारब्धबल लागतें असा सिद्धांत "नायमात्मा बलहीनेन लभ्यः" ह्या श्रुतीनें सांगितला आहे; आणि

"चणे खावे लोखंडाचे। तरी ब्रह्मपदीं नाचे॥"
"तुका म्हणे भक्ति। सुळावरिल पोळी॥ ज्याचे असे कपाळीं त्यासि मिळे॥" ह्या संतोक्तिद्वयात त्याच श्रुतीचा अनुवाद केलेला आहे.

सांख्यमार्गांतील साधन-चतुष्टयाप्रमाणेंच यमनियमादि अष्ट योगसाधनेंही पूर्ण वैराग्यमूलकच आहेत. पूर्ण वैराग्याशिवाय योग साध्य होणें शक्य नाहीं, हें रहस्य अर्जुनाच्या मनांत पक्केपणें बिंबावे एतदर्थ श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेच्या द्वितीयाध्यायांतील योगमार्गोपदेशारंभींच त्याला

"त्रैगुण्य विषयावेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन।
निर्द्वंद्वो नित्य सत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्॥"

असा स्पष्ट उपदेश केला आहे. एवंच पूर्ण वैराग्याशिवाय गीतेतील ब्रह्मनिष्ठेचा यत्किंचितहि लाभ होणे शक्य नाहीं, हें गुह्य रहस्य " **तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ** " इत्यादि अनेक वचनांनीं भगवंतानीं वारंवार अर्जुनास बजावून सांगितलें आहे; आणि तत्सिद्ध्यर्थ सर्व भगवद्गीतेंत अपरिहार्य प्रारब्धप्राप्त कर्माखेरीज–शास्त्रोक्त नित्य, नैमित्तिक, प्रायश्चित्त व उपासना एतद्विरहित क्रियमाणाचा कोठेंहि यत्किंचित् देखील उल्लेख केलेला नाहीं; कारण एतद्विरहित असलेलीं सारीं क्रियमाणकर्में अकर्में किंवा विकर्मेंच होत.



श्री नृसिंह बाबा महाराज पांचलेगांवकर



श्री मुक्तेश्वर-महाराजांचें दैवत.

## रामनवमी

या अंकात दिलेल्या ह. भ. प दासगणू बुवाच्या अहवालावरून साला-बादप्रमाणें रामनवमी उत्सव शिर्डीस साजरा झाल्याचें कळून येईलच. हा रामनवमीचा उत्सव शिर्डीस कसा सुरू झाला, त्याचें स्वरूप वगैरेसंबंधीं श्री. साईलीलेंत आम्हीं पूर्वी सविस्तर विवेचन केलें आहे. तेव्हा कार्य-क्रमात प्रसिद्ध केल्याप्रमाणें उत्सव थाटानें झाला याशिवाय जास्ती लिहि-ण्याचे काहीं प्रयोजन नाहीं. परंतु यंदाचे उत्सवास एका गोष्टीनें विशिष्ट महत्त्व प्राप्त झाले होतें. ती विशिष्ट गोष्ट म्हणजे उत्सवाकरिता मोंगलाईतील एक प्रसिद्ध बाल सत्पुरुष श्री. पांचलेगांवकर नृसिंह बाबा महाराज यांचें झालेले आगमन होय. शिर्डीस उत्सवास एकवार यावें म्हणून ह. भ. प. दासगणू बुवानीं त्यांना २।३ वेळां विनंति केली होती व शेवटीं यंदां त्यांनीं येण्याचे कबूल केले. व त्याप्रमाणें ते आले. श्री. नृसिंहबाबा महाराजांचा मोंगलाईंत लौकिक फार मोठा आहे. त्यांचें वय अवघें १५ वर्षाचे आहे. परंतु सर्व निजामशाहींत थेट निजामसाहेबापासून, रंकापर्यंत त्यांच्याबद्दल आदरयुक्त भावना आहे, व ते एक मोठे सत्पुरुष आहेत अशी त्यांची कीर्ति आहे.

ह. भ. प. दासगणू बुवाना प्रथम त्यांची थोडीबहुत माहिती ऐकून झाली होती. दोघांची जी प्रथम भेट झाली त्याची हकीगत थोडी मनोरंजक आहे. एके वेळीं महाराज ( सबंध नाव न लिहितां यापुढें श्री. नृसिंहबाबा महाराजांचा नुसते "महाराज" व दासगणू बुवाचा "बुवा" असाच उल्लेख केला आहे. ) बुवाकडे गेले व ' दासगणू महाराज ते तुम्हींच का ' असा प्रश्न केला. बुवानीं त्यांना हो म्हणून उत्तर दिल्यांवर दुसरा प्रश्न ' तुमच्याकडे लोक कशानें चालतात ?' असा केला. बुवानीं उलट विचारलें कीं 'आपलेकडे कशानें चालतात ? ' त्यावर महाराज उत्तरले कीं ' आमचेकडे डोक्यानें चाल-तात.' बुवा म्हणाले ' आमचेकडे कानानें चालतात. ' महाराजांनीं विचारलें ' कानानें कसे चालतात ? ' बुवानीं विचारलें ' डोक्यानें कसे चालतात ? ' त्यावर महाराज म्हणाले ' आमचेकडे लोक डोक्यांत काहीं तरी विचार घेतात व त्या नादांत ते चालतात ' बुवा म्हणाले ' आमचेकडे लोक

कानाने काहीं तरी ऐकतात व त्या नादांत ते चालतात. ' इतका हा प्रश्नोत्तररूपी संवाद झाल्यावर महाराज निघून गेले. त्या नंतर काहीं कालानें नादेडास एका मारवाड्यानें पंगत घालण्याचें ठरविलें होतें. महाराज तेथें आले व ४।५ सर्प बरोबर घेऊन बुवाचे भेटीला गेले. महाराज सर्प धरतात, कोणाला चावल्यास विषार बाधत नाहीं, ह्या गोष्टी बुवाचे कानीं पूर्वी आलेल्या होत्या, परंतु प्रत्यक्ष सर्प पाहिल्यावर बुवांची गाळण तर उडालीच. महाराज बुवाचे गळ्यांत सर्प घालूं लागले, तेंव्हा तर बुवांना फार भीति वाटून तसे न करण्याबद्दल त्यांनीं महाराजांना विनंति केली. महाराजांनीं ती ऐकली व रात्रीं तुमच्या कीर्तनाला आम्हीं येऊं म्हणून सांगितलें. त्यावर बुवांनीं त्यांना सांगितलें कीं, आपण कीर्तनाला या, पण (सर्पांकडे हात दाखवून) बरोबर आपली ही स्नेहीमंडळी आणूं नका. कारण मी भित्रा आहे व हे नाग पाहिले म्हणजे मला कीर्तन सुचणार नाहीं. महाराज रात्रीं कीर्तनाला एकटेच आले. दुसरे दिवशीं पंगत व्हावयाची होती. पंगत घालणाऱ्या मारवाड्यानें महाराजांना भोजनास बोलाविलें. महाराज म्हणाले, दासगणू महाराज भोजनाला आले तर मी येईन. मारवाडी बुवांना आमंत्रण देण्यास गेला. मी कोठें जेवायला जात नाहीं असें बुवांनीं त्याला सांगितलें. तो निरोप महाराजांना मारवाड्यानें पोहोंचविल्यावर महाराज उठले व गोदावरी तीरावर जाऊन त्यांनीं डोहांत बुडी मारली. लगेच सर्व मंडळी व बुवा गोदावरी तीरावर गेली. पहातात तो महाराज पाण्यांत. मधून मधून डोकें वर काढीत व माणसें पाहून पुन्हां बुडी मारीत. या प्रमाणें महाराज त्या खेपेला ४८ तास पाण्यांत राहिले व मग बाहेर निघाले. हा असामान्य प्रकार पाहून बुवा तर थक्कच झाले. उत्तरोत्तर बुवांचा व महाराजांचा संबंध अधिकाधिक येऊं लागला, व महाराजांच्या अलौकिक सामर्थ्याची त्यांना जाणीव होत गेली.

कै. दामुअण्णांचा मुलगा अवघा ४।५ वर्षे वयाचा आहे. तो बहुतेक बुवांकडेच असतो. महाराजांच्या सहवासांत तोही सर्पाशी खेळूं लागला.

१ आपण ज्याला भंडारा किंवा गांवजेवण म्हणतों त्याला तिकडे पंगत म्हणतात.

बुवाचा बालशिष्य तुकारामही सर्व पकडण्यांत तरबेज झाला. या अंकात दिलेल्या महाराजांच्या छायाचित्रात जो धाकटा नाग आहे तो तुकारामानें आपल्या आजेगांवी धरून आणला होता.

दुसरी एक विशिष्ट गोष्ट बुवाचे पहाण्यांत अशी आली कीं, कोणत्याही वेदाची ऋचा कोणी म्हणो, महाराज त्यांचे बरोबर ती ऋचा म्हणूं लागत इतकेच नव्हे तर जरी तो इसम मध्येंच थांबला, तरी महाराज ती ऋचा एकटेच पुढें म्हणत. १५ वर्षाच्या मुलाने वेदाच्या ऋचा म्हणाव्यात, हें सामर्थ्य काहीं लहान नव्हे. अशी ही महान विभूति एकदां आपल्या मंडळीच्या दृष्टीं पडावी अशी बुवांना साहाजिकच इच्छा होऊन त्यांनीं महाराजांना शिर्डीस येण्याचें निमंत्रण दिलें. उत्सवास महाराज येणार ही खबर श्री साईलीलेंत व बुवांच्या निमंत्रण पत्रिकेंत आगाऊ दिली असल्यामुळें यंदा उत्सवाला पुष्कळच मंडळी आली. श्री साईनाथ महाराजांनीं देह ठेवल्यावर एवढा समाज पूर्वी शिर्डीस केव्हांच जमला नव्हता. समाधीगृह, साठेसाहेबाचा वाडा, कै. काकासाहेब दीक्षितांचा वाडा, व इतर शिर्डीस मिळूं शकलीं तीं घरे, आलेल्या पाहुण्याना अपुरींच पडलीं. उत्सवांस आलेल्या भक्तमंडळींचीं नांवें बुवांच्या अहवालांत दिलीं आहेत; परंतु त्यांतील कित्येक जण सहकुटुंब व कांहीं आपली स्नेहीमंडळी बरोबर घेऊन आले होते.

चैत्र शुद्ध अष्टमीला सकाळीं महाराज येणार होते. परंतु ते आले नाहींत. त्यामुळे महाराजांच्या आगमनाबद्दल मंडळी जरा साशंक झाली. पण शेवटीं संध्याकाळीं महाराजांच्या देवांचे पुजारी वे. श्री भाऊ देव, महाराजांचे देवस्थानासह शिर्डीस येऊन पोहोंचले, व महाराज नवमीला सकाळीं येतील असें त्यांनीं सांगितलें. कोपरगांव स्टेशनवर महाराजांना उतरून घेण्याकरितां बुवांनीं आपली मंडळी पाठविलीच होती. नवमीला सकाळीं सुमारें ७॥ वाजतां महाराजांचा तांगा शिर्डीच्या शिवेच्या ओढयावर आला. त्या ठिकाणीं बुवा, माधवराव देशपांडे, तात्याबा पाटील कोतें, काकासाहेब महाजनी, रामचंद्र पाटील वगैरे मंडळी महाराजांना सामोरी गेली. महाराज तांग्यांतून खालीं उतरले व त्यांना पुष्पहारानें मंडीत केल्यावर तेथून मिरवणूक काढून

त्याना वाजतगाजत शिर्डीत आणलें. महाराजाबरोबर हिंगोलीचे सावकार श्रीमत वामन रामचंद्र नाईक उर्फ बापुसाहेब डोईफोडे, रा. पत्की खामगांवकर, व महाराजाचे २।३ सेवेकरी, इतकी मंडळी होती. महाराजांची राहणी त्याच्या वृत्तीला साजेल अशीच दिसली. एकासोवळ्याच्या कौपिनीशिवाय दुसरें कांहीं वस्त्र ते वापरीत नाहींत. छायाचित्रांत ज्या वेषात आहेत, तसेच नेहमीं असतात. महाराजानीं प्रथम श्रीसाईनाथ महाराजाच्या समाधीचे भक्तिभावानें दर्शन घेतले व नंतर जमलेल्या मंडळींच्या ओळखी करून घेतल्या. त्यातील १।२ माणसाना मात्र त्यानीं आपण होऊनच तुम्हीं अमुक काय असे विचारलें व त्यांनीं होय म्हटल्यावर तुमचे नांव मी ऐकलें होते असे सांगितलें. अर्थात् हें त्यानीं तर्कानेंच जाणले असले पाहिजे; परंतु इतक्या लहान वयांत इतकी तर्कबुद्धि असणे हेंही विशेषच आहे.

रामनवमी उत्सवाप्रीत्यर्थ दरसाल प्रमाणे नवमीला सकाळीं समाधिवर लघु रुद्राभिषेक सुद्ध झाला. सुमारे १०॥ वाजता अभिषेक संपून समाधीचें अभ्यंग स्नान गंगोदकाने झालें व नंतर समाधि वस्त्रविभूषित झाल्यावर सर्व भक्तमडळींनी पूजा केल्या. तदनंतर सुमारे ११॥ वाजतां ह. भ. प. दासगणू बुवा कीर्तनास उभे राहिले. यंदा जनसमूह फार असल्यामुळें कीर्तनाला अतिशय गर्दी झाली होती, व त्यामुळे कीर्तनाला रंगही फार आला. रामनवमीला अर्थात श्री रामजन्माचेंच आख्यान असावयाचें. बुवांच्या कीर्तनांचीं आख्यानें स्वरचित असतात, हे कोणाला सांगावयास नकोच. त्यांचे श्री रामजन्माचें आख्यान श्रीसाईलीलेंत अद्याप प्रसिद्ध झालें नाहीं, म्हणून या खेपेस आम्ही तें देण्याचें योजिले आहे. त्यांतील गद्य मजकूर अक्षरशः बुवांचा नाहीं. वेळेच्या अभावीं पूर्वरंग अगदींच थोडक्यात आटोपून, बुवानीं आख्यान सुरू केलें.

मामुली ईशस्तवन झाल्यावर आख्यानास सुरवात पुढील आर्येपासून झाली.

**सनत्कुमारें दिधला जय विजया शाप रोकिता त्यासी ।**
**असुर कुळीं जन्मा जा गोब्राह्मण ते छळावया महिसी ॥**

( अपूर्ण )

# हिंदु धर्माचीं मुख्य तत्त्वें.

( लेखकः—कुलगुरु चिंतामणराव वि. वैद्य )

हिंदु धर्माचीं मूलभूत मुख्य तत्त्वें काय आहेत या विषयीं इतर धर्मियांना माहिती नसतेच, पण हिंदु लोकानाही चांगलीशी माहिती नसते. यामुळें आपल्या धर्माविषयीं आपल्याच लोकांत कांहींसा अनादर असतो व हिंदु धर्मांविषयीं योग्य प्रसंगीं आपले आचरण बलहिनांसारखें होतें. सर्व धर्मांचीं तत्वे काहीं एका अंशात एकच असतात व उदात्त नीतिमत्तेचा सर्वांनींच अवलंब केलेला आहे. परंतु कित्येक महत्त्वाच्या बाबतींत निरनिराळ्या धर्मांत मतभेद असतो. असे हे हिंदु धर्माचे वैशिष्टय कोणत्या बाबींत आहे आणि ते तर्कास कसें पटण्यासारखें आहे हें नवीन शिकलेल्या व नवीन संस्कृती-संबंधीं अनुकूल कल्पना असलेल्या हिंदु वाचकवर्गास सांगण्याची आवश्यकता आहे. या साठीं या लेखमालेच्या द्वारे हिंदु वाचकांसमोर या प्रश्नावरील माझ्या अल्प समजुतीचीं मते मीं मांडीत आहे.

लोकमान्य टिळकांनीं हिंदुत्वाचे लक्षण एका लहानशा श्लोकात मार्मिक रितीने केलें आहे.

**प्रामाण्य बुद्धिही वेदेषू साधनानाम् अनेकता।**
**उपास्यानाम् अनियमश्च एतत् हिंदुत्व लक्षणम् ॥**

या श्लोकांत हिंदुत्वाचे व परियायाने हिंदु धर्मांचें थोडक्यांत मुद्देसूद वैशिष्टय लोकमान्यांनीं दिलें आहे. या अनुरोधानें पहिलें वैशिष्टय वेदाविषयीं प्रमाणबुद्धि हें आहे. याजविषयीं या लेखांत आपण सांगोपांग विचार करूं.

प्रत्येक धर्माला ईश्वरप्रणीत एक धर्मग्रंथ मानणें अत्यंत आवश्यक आहे. ईश्वर आहे कीं नाहीं. परलोक आहे कीं नाहीं, आत्मा आहे कीं नाहीं, मरणानंतर आत्म्याची काय स्थिति होते, या जगांत भिन्नता सुखदुःखाची कां, इत्यादि प्रश्न कोणत्याही लौकिक ज्ञानानें सुटत नाहींतच—पण तत्त्व ज्ञानानें सुद्धां सुटत नाहींत. फिलॉसफीची म्हणजे तत्त्वज्ञानाची गति येथेंच

कुठीत होते. या प्रश्नाचें उत्तर प्रत्येक धर्मांत दिलेले असते व कांहीं बाबतींत तें भिन्नही असतें. हें उत्तर ईश्वरी प्रेरणेने किंवा अतींद्रिय ज्ञानानें काहीं विशिष्ट पुरुषच देऊं शकतात व अशा पुरुषानीं सांगितलेले किंवा लिहिलेलें धर्मसंबंधीं ज्ञान हें ईश्वरानेंच दिलेलें आहे ही भावना ठेविल्याशिवाय कोणत्याही धर्मीयाचें चालावयाचे नाहीं. तात्पर्य प्रत्येक धर्माला ईश्वरप्रणीत (Revelation) मानावाच लागतो. खिश्चन लोकांस जसें बायबल् किंवा मुसलमानास जसें कुराण तसे हिंदु लोकांस वेद हे प्रमाण आहे. वेद ईश्वरप्रणीत आहेत, पुरुषकृत नाहींत अशीच भावना हिंदुधर्मीयानीं ठेविली पाहिजे. याचा अर्थ असा नव्हे कीं, वेद ईश्वरानें प्रत्यक्ष येऊन सांगितलें आहेत. ऋषीनीं ईश्वरप्रेरणेनें वेदांचे मंत्र उच्चारिले. आस्तिक मतें ही गोष्ट निःसंशय सत्य आहे, पण ज्यास हें पटत नसेल त्याने एवढें तरी मान्य केलें पाहिजे कीं, अशी कल्पित भावनेची कां होईना, श्रद्धा ठेविल्याशिवाय धर्माचें पाऊलच पुढें पडूं शकत नाहीं. येशू, बुद्ध, महमद, अशांसारखे ईश्वरी प्रेरणेचे पुरुष धर्मसंबंधीं तत्त्वें सांगण्यासाठीं मानिलेच पाहिजेत व त्यांचें सर्व सांगणें प्रमाणच मानलें पाहिजे. कारण अतींद्रिय गोष्टीचें ज्ञान अशा शब्दप्रमाणाशिवाय दुसऱ्या कोणत्याही प्रमाणानें मिळणें शक्य नाहीं. वेदमंत्राचे कर्ते म्हणजे द्रष्टे ऋषि हे अशाच प्रकारचे अतींद्रिय ज्ञानवान् होते आणि त्यांनीं जें वेदांत सांगितलें आहे तें प्रमाण आहे असेंच हिंदूंनीं मानलें पाहिजे. ....

एवढी गोष्ट मान्य केली पाहिजे कीं, हा मान कांहीं व्यक्तीपुरताच व कांहीं ग्रंथापुरताच मर्यादित करावयाचा आहे. लोकमान्यांनीं वेदांचे ठिकाणीं प्रमाण बुद्धी एवढीच प्रमाणमर्यादा घातली आहे ती योग्य आहे. पुराणामध्यें प्रामाण्य बुद्धी ठेवावयास पाहिजे असें नाहीं. हिंदु धर्माच्या कित्येक शाखांनीं पुराणांचें प्रामाण्य मानलें नाहीं. दयानंदाच्या आर्यसमाजानें वेदांच्या ब्राह्मण भागांचें प्रामाण्य मानलें नाहीं तरी ते पूर्ण हिंदु होत. कारण वेदांच्या मंत्रांचें प्रामाण्य ते मानतात आणि ऋषीनाही अतींद्रिय ज्ञानाचे ते समजतात. शीख लोकही जरी त्यांच्या ग्रंथाप्रमाणें चालतात तरी गुरु नानकानें त्या ग्रंथांतच वेदांचें प्रामाण्य मानलें असल्यामुळें ते पूर्णपणें हिंदु आहेत. जैन आणि

बौद्ध हे वेदाना प्रमाण मानीत नाहीत तथापि ते वेदांनीं प्रतिपादिलेले कर्मादि सिद्धांत मानितात आणि यामुळे त्यास हिंदु मानण्यास हरकत नाहीं. असो. तर प्रत्येक खऱ्या हिंदूनीं वेदाचे प्रामाण्य मानलेच पाहिजे ही गोष्ट सत्यास व तर्कास, दोहींस धरून आहे.

येथे कित्येकांस अशी शंका येते कीं वेद चार आहेत आणि ऋषी अनेक आहेत, भिन्न वेदांत भिन्न मते सांगितलेलीं असून एकाच वेदात भिन्न ऋषींचीं भिन्न मते दृष्टीस पडतात

" श्रुतिर्विभिन्ना स्मृतयोपि भिन्ना नैको मुनिर्यस्यमत प्रमाणम् ॥ "

अशी वेदाची स्थिति असल्यामुळे वेदांविषयीं किंवा तदनुसार स्मृतीविषयीं प्रमाणबुद्धि कशी ठेवावी हा भिन्नत्वाचा आरोप पुष्कळ समंजस हिंदूही करतात आणि त्यामुळे हिंदु धर्माला मोठे वैगुण्य आहे, किंबहुना हिंदु धर्माचें दौर्बल्य याचमुळे आहे असें मानतात. पण ही त्यांची मोठी गैरसमजूत आहे. सर्व स्मृतींचा आशय एकच आहे, असा हिंदु धर्माचा महासिद्धांत आहे. त्याचप्रमाणें श्रुतीचाही आशय एक आहे असेंच हिंदु धर्म मानतो, किंबहुना अशी प्रत्यक्ष स्थितीही आहे. कांहीं विधीसंबंधीं कोठे कोठे मतभेद आहे तेथें धर्मशास्त्राचा असा निर्णय आहे कीं, कोणताही एक विधि केल्यास हरकत नाहीं. भिन्न भिन्न ऋषींच्या प्रतिपादनांत वस्तूचे वर्णन एकच आहे. ईश्वराचें स्वरूप काय, आत्म्याची गति काय, याविषयीं सर्व वेदाचें एकच म्हणणें आहे. तात्पर्य वेद अनेक आहेत ही गोष्ट खरी असली तरी त्या सर्वांचें सांगणें एक आहे असें हिंदुधर्मियांनीं मानलें पाहिजे. इतकेंच नव्हे, तर वस्तुस्थितीही अशीच आहे. बरें, मुसलमानाचें कुराण एक आहे आणि ख्रिस्ती यांचें बायबल् एक आहे, तरी सुद्धां त्याच्यांत अनेक मते आहेतच. एकाच वाक्याचे भिन्न अर्थ करून आणि एकाच वर्णनाचा भिन्न आशय समजून ख्रिस्ती धर्मांत रोमन कॅथोलिक, ग्रीक चर्च प्राटेस्टंट, मनिचियन् इत्यादि अनेक भिन्न मते आहेत आणि इस्लामी धर्मांतही शिया, सुनी, वहाबी, इत्यादि

अनेक मते आहेत. तात्पर्य, हिंदुधर्मियात जे विशेष औदासिन्य किंवा मत-मताचे जे भाडण आहे ते वेद चार आणि ऋषी अनेक आहेत म्हणून नव्हे, तर तें हिंदुधर्मियाच्या जातिस्वभावामुळे आहे. भिन्न पंथ असले तरी मुसलमान, इस्लामी धर्माचा प्रश्न आला म्हणजे जितक्या आवेशाने एक होतात, तितक्या आवेशाने हिंदु एक होत नाहींत. याचे कारण वेद अनेक आहेत हे नव्हे. वेद एकच असता आणि ऋषी एकच असता तरी सुद्धां हिंदु लोकात अनेक पंथ उत्पन्न होऊन ते एकमेकाशीं विलग आणि भाडणारे होऊन हिंदु धर्म हल्लीं-प्रमाणेंच हिंदूंच्या जातिस्वभावामुळे दुर्बल राहिला असता. असो. तर वेद अनेक आहेत आणि ऋषी अनेक आहेत यात काहीं वैगुण्य नाहीं किंबहुना मनुष्यात मत वैचित्र्य असल्याने हे अनेकत्व भिन्न स्वभावाला अनुकूल असेंच आहे. हिंदुनी वेदाच्या अनेकत्वामुळें त्याच्या ठिकाणीं प्रामाण्यबुद्धि हालूं देऊं नये मात्र केंद्रोत्क्षेपक आपला स्वभावधर्म सोडून हिंदूंनीं सर्व वेदांच्या ठिकाणीं सारखी पूज्यबुद्धि ठेवावी. ऋग्वेद्यानीं यजुर्वेदियास हलके समजूं नये किंवा अथर्ववेदियानीं आम्हीं श्रेष्ठ, इतर कनिष्ठ असे मानूं नये. सर्व वेदास सारखेच पूज्य मानून सर्व हिंदूंनीं हिंदु धर्मास बळकटी आणली पाहिजे. वेदांच्या किंवा ऋषींच्या अनेकत्वाप्रमाणें हिंदुधर्मांत साधनांचीही अनेकता मानलेली आहे. वेदांतच, कर्ममार्ग, ज्ञानमार्ग आणि उपासना असे तीन मार्ग उपदेशिलेले आहेत. ईश्वरप्राप्तीसाठीं भगवद्गीतेने भक्तिमार्ग आणखी उपदेशिला आहे. याशिवाय सांख्य आणि योग असे दोन मार्ग भगवद्गीतेतच उल्लेखिलेले आहेत. नुसत्या कर्ममार्गाकडे पाहिलें तरी अनेक प्रकारचीं कर्मे व यज्ञ, वेदांत सांगितलेले आहेत. वैदिक उपासनाही अनेक आहेत आणि ज्ञानमार्गाचे रस्तेही भिन्न आहेत. योगामध्ये सुद्धां निरनिराळे योग सांगितलेले आहेत. नुसती सध्याच घेतली तरी निरनिराळ्या वेदांची व निरनिराळ्या शाखांची निरनिराळी असते. तेव्हां अशा या अनेक भिन्न मार्गांनीं व साधनांनीं परमेश्वराची प्राप्ति कशी व्हावी असा एक प्रकारचा आक्षेप परधर्मी लोक हिंदु-धर्मियांवर घेतात. किंबहुना आपल्यामध्यें अनेक पंथ असल्यानें, आपले लोक हिंदुधर्मास हीनबळ समजतात. परंतु अशा प्रकारची समजूत असणें मागील

समजुतीप्रमाणेच गैर आहे. एकाच ठिकाणीं जाण्यास जसे अनेक मार्ग असतात, त्याचप्रमाणें हिंदुधर्मांत परमेश्वरप्राप्तीचे अनेक मार्ग उपदेशिले आहेत, यात गैर ते कोणते ? मनुष्यस्वभाव भिन्न असल्याने, त्या त्या स्वभावास झेपेल किंवा रुचेल अशा प्रकारचा भिन्न मार्ग असला तर त्यांत चुकी कोठें ? ज्ञानमार्गीयानीं चोखाळलेल्या अव्यक्त उपासनेचा मार्ग साधारण कमी समजुतीच्या व कमी बुद्धीच्या मनुष्यास कसा उपयोगी पडेल' स्त्रियांची कल्पना व मनोभावना पुरुषांच्या मनोभावनेहून भिन्न असते. तेव्हां त्याना भक्तिमार्ग हा जास्त फलप्रद आहे असे कोण म्हणणार नाहीं ? तात्पर्य. निरनिराळ्या प्रकृतीनां अनुरूप असे भिन्न परमेश्वरप्राप्तीचे मार्ग हिंदुधर्मांत सांगितले आहेत, हे त्याचें वैगुण्य नसून हा त्याचा अलंकार आहे. मात्र मागील विषयाप्रमाणें या विषयांतहि जी चूक होते, ती अशी कीं, ज्ञानमार्गीयानी योगमार्गास कमी लेखावे आणि कर्ममार्गी यानीं आणि ज्ञानमार्गीयानीं भक्तिमार्गास स्त्रीशूद्राचा हा मार्ग आहे असें म्हणून त्याची हेटाळणी करावी व तो मोक्षास मिळणार नाहीं, अल्पफल आहे असें म्हणून आपली प्रौढी मिरवावी; खरी गोष्ट अशी आहे कीं, हे सर्व- मार्ग सारखेच मोक्षास मिळणारे आहेत आणि आपापल्या रीतीने परमेश्वराची प्राप्ती करून देणारे आहेत. "**संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ॥ तेपियान्ति मामेव ।** इत्यादि भगवद्गीतेच्या वाक्याप्रमाणे सर्व मार्ग मोक्षास नेणारे आहेत अशी सर्व हिंदुधर्मीयानीं भावना ठेवावी आणि कोणाची अवहलेना करूं नये. नुसती भावनाच नव्हे तर वस्तुस्थितीही अशीच आहे. किंबहुना हिंदु धर्माचें उदात्त तत्त्व असें आहे कीं, मुसलमानांनीं सुद्धां आपला धर्म योग्य रीतीनें व श्रद्धेनें पाळला तर तेही मोक्षास जातील. मग भक्तिभावानें विठोबाचें भजन करणारे श्रद्धावान शूद्र हे मोक्षास जातीलच, यांत संशय नाहीं. तेव्हां ब्राह्मण किंवा राजऋषी हे भक्तिमार्गानेंही मोक्षास जातील यात नवल काय ? असें भगवद्गीता सांगते. एवढेंच नव्हे तर मला कधीं कधीं असें वाटतें कीं, आमचा ज्ञानमार्ग किंवा कर्ममार्ग किंवा योगमार्ग खरा मोक्षास नेणारा आहे असें प्रतिपादणारे अहमन्य ब्राह्मण जागच्या जागींच राहातील किंवा मार्गच्या

काठिन्यामुळे भगवन्मार्गांत त्याची फारशी प्रगति होणार नाहीं. पण साधेभोळे. कमी बुद्धीचे श्रद्धावान शूद्र, भक्तिमार्गाचा दृढ आश्रय धरून शेवटचा पल्ला गाठतील. तात्पर्य गरुड पक्षी आणि कासव यांच्या गोष्टी-प्रमाणें भक्तिमार्गी शूद्र किंवा भोळे ब्राह्मण हळू हळू नियमित रोज मार्ग चालून परमसिद्धीला निश्चयाने पोचतील आणि इतर मार्गी अहमन्यतेने मागें राहातील असे होण्याचा पुष्कळ संभव आहे. असो तर हिंदु धर्मांत ईश्वरप्राप्तीच्या साधनाचीं अनेकता मान्य केली गेली आहे. मोक्षाचे अनेक मार्ग असून आपापल्या परीने ते सर्वच सारखे फल देणारे आहेत अशी हिंदुधर्मीयानी दृढ भावना ठेऊन कोणत्याही मार्गाची कोणीही अवहेलना करूं नये.

याच विषयासंबधानें आणखी एक गोष्ट अशी सांगावयाची कीं, हिंदुधर्मांत भक्तिमार्गांत प्रतिमापूजन हे मान्य केलें गेले आहे. प्रतिमापूजनाची इतरमार्गीयांनी कधीं कधीं निंदा केलेली आहे. परधर्मी लोक तर हिंदुधर्माच्या या प्रतिमापूजनास मूर्खपणा समजतात. आर्यसमाजानें व शीख धर्मानें प्रतिमा-पूजनास मनाई केलेली आहे, याचे कारण बहुधा मुसलमानांनीं केलेला प्रतिमा-पूजनावरचा हल्ला हाच असावा. तें कांहीं असो. प्रतिमापूजन हिंदुधर्मांस मान्य आहे. हा सिद्धांत सोडतां येत नाहीं. हजारों किंबहुना लाखों हिंदु प्रतिमांचे पूजन करितात आणि भक्तिभावाने त्या त्या रूपांत ईश्वराची सेवा करतात, ही गोष्ट चूक आहे असें कदापि म्हणतां येणार नाहीं. मात्र येथेंही हिंदुधर्मीयांस एक इषारा देणें अवश्य आहे. मूर्तींत जे ईश्वरत्व वसत असतें तें आपल्या भाव-नेनें वसत असते; मूर्तींच्या द्वारे ईश्वराच्या ठिकाणीं आपली भावना संलग्न करावयाची असते. दगडामातीच्या मूर्तींत ईश्वरीसामर्थ्य नाहीं आणि आपल्या भावनेनें तें तेथें जागृत करावयाचे आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. आपली भावना हीन असेल तर मूर्तींत सामर्थ्य प्रकट होणार नाहीं. गजनीच्या महमुदानें सोमनाथाची मूर्ति फोडली, त्यावेळेस सोमनाथाच्या मूर्तींत ईश्वरी-सामर्थ्य प्रकट झालें नाहीं, याचे कारण ब्राह्मणांनीं आपल्या तीव्र भावनेनें

ते जागृत केलें नाहीं. त्याची नजर मूर्तींत लपविलेल्या व गाभाऱ्यात साठविलेल्या लाखो रुपये किंमतीच्या हिऱ्यामाणकांत गुंतली होती. माराश मूर्तींत सामर्थ्य नाहीं, भावनेत आहे आणि प्रतिमा ध्यानसाधनाकरिता आहे हे हिंदुधर्मियांनीं नेहमीं लक्षात ठेवावें.

" उपास्यानामनियम: " असें लोकमान्यांचे तिसरे सूत्र आहे ज्या देवाची उपासना करावयाची तो देव अमुकच असावा असा हिंदुधर्माचा नियम नाहीं. अर्थात उपास्यदेव अनेक आहेत, हे हिंदुधर्मांत पुर्वीच्या दोन गोष्टीप्रमाणे म्हणजे धर्मग्रंथाच्या व मोक्षमार्गाच्या अनेकत्वाप्रमाणे, हिंदुधर्मांत गृहीत केलेले आहे, हे कबूल करावें लागतें. तेथेंही हिंदुधर्मियांची मोठी भयंकर गैरसमजूत असते की, देव खरोखरच हिंदुधर्मात अनेक किंबहुना कित्येक कोटी आहेत. हिंदुधर्मियाची ही भ्रांत कल्पना, मग परधर्मियांची तशी असेल यात आश्चर्य काय? आणि येथेंही हिंदुधर्मियांचा जातिस्वभाव म्हणजे भांडखोरपणा विकोपास गेलेला दिसतो. शैव लोक शिवास मोठा मानून विष्णूस त्याचा दास मानतात, तर वैष्णव लोक विष्णूस खरा व मोठा देव मानून शिवपूजा नर्कास नेणारी आहे असें म्हणतात. या शैव आणि वैष्णव पंथाच्या अनुयायांचा तंटा प्राचीन काळापासून म्हणजे उपनिषदकाळापासून आतांपर्यंत सारखा चालत आलेला आहे. हिंदुस्थानाच्या इतिहासात यापासून देशाचें किती नुकसान झालेलें आहे हे मी मध्ययुगीन भारत भाग ३ यांत दाखविलें आहे. मद्रासकडच्या एका शैव राजाने रामानुजास विचारिलें कीं, शिव मोठा कीं विष्णू मोठा? या प्रश्नाचे उत्तर देणें कठीण वाटल्यामुळें रामानुजास देश सोडून पळून जावे लागले. शिव आणि विष्णू या दोन उपास्यदेवतेंच्या उपासनेच्या तंट्यांत सूर्य, गणपती, देवी, दत्तात्रय, खंडोबा इत्यादि देवतेंच्या उपासनाच्या तट्याची आणखी भर पडली आहे. पण हिंदुधर्माचा याप्रमाणे जरी प्रत्यक्षत: लोकांत बोजवारा झालेला आहे तरी हिंदुधर्माचें मूळ उज्ज्वल तत्त्व देव एकच आहे असें आहे आणि तो देव चराचर व्यापून आहे. बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्य आणि जनक यांच्या संवादांत, ही गोष्ट स्पष्टपणें समजावून

सांगितली आहे. देव किती आहेत असा याज्ञवल्क्याला एका ऋषीनें प्रश्न केला. तेंव्हा त्यांनीं तेहतीस कोटी आहेत असे प्रथम उत्तर दिले. ऋषीनें पुन्हा विचारिले, देव किती आहेत ? तेंव्हां याज्ञवल्क्यांनीं उत्तर दिले ३३ तेहतीस आहेत. तेहतीस कोटि हा देवाचा महिमा आहे. ऋषीनें पुन्हा विचारलें, देव किती आहेत; याज्ञवल्क्याने उत्तर दिले तीन, पुन्हा विचारलें त्या वेळेस उत्तर दिले दोन, आणि पुन्हा विचारले तेंव्हा एक असे याज्ञवल्क्यांनीं उत्तर दिले. हा एक देव कोणता असे ऋषीने विचारले तेंव्हा सर्व चराचर सृष्टीस व्यापून राहणारा सर्वांच्या अंतर्यामीं राहून सर्व सृष्टीस चालविणारा असा जो परमेश्वर त्याचे फारच मनोहर वर्णन याज्ञवल्क्यानीं येथे केले आहे. असो. तर देव एक आहे, ईश्वर एक आहे, अशी हिंदुधर्माची मूलभूत दृष्टि आहे. हे निरनिराळ्या देवाचे जें धर्मग्रंथात वर्णन येते ते ऋषीनीं एकाच परमेश्वराच्या भिन्नभिन्न शक्तीकडे लक्ष देऊन निराळे स्वरून कल्पिलेले आहे असा हिंदुधर्माचा प्राचीनतम सिद्धांत आहे.

**" एकं सद्विप्रा बहुधा आमनन्ति इन्द्रं यमं, मातरि श्वानमाहु । "**

असें ऋग्वेदमंत्रांत स्पष्ट सांगितलें आहे. परमेश्वर एकच असून त्याला विद्वान् लोक बहु प्रकारानें मानून इंद्र, यम, वायु इत्यादि त्यास नांवें देतात. तात्पर्य देव एकच असून हिंदुधर्मांत भिन्न भिन्न शक्तीच्या उपासनेसाठीं त्याचीं अनेक रूपें मानिलेलीं आहेत ही गोष्ट हिंदूंनीं पक्की ध्यानांत धरावी.

तेंव्हां शिव मोठा कीं विष्णु मोठा असा प्रश्न करणारे हिंदु लोक किती मूर्ख असतात किंबहुना स्वधर्मघातक होतात याची वाचकांनीं कल्पना करावी. सृष्टि उत्पन्न करणें, तिचें पालन करणे, तिचा संहार करणे इत्यादि सर्व एकच ईश्वर करतो. 'जन्माद्यस्य यतः' असे परब्रह्माचे लक्षण वेदांतसूत्रांत आहे. या निरनिराळ्या शक्तीचें अधिष्ठाते देव उपासनेसाठीं ब्रह्मा, विष्णु, महेष असे आपण कल्पिलेले आहेत. ईश्वराची प्रकाश देणारी शक्ति सूर्य आहे; विद्या देणारी शक्ति गणपती आहे; नुसतीच शक्ति या स्वरूपाने ईश्वरास देवी मानलें आहे. या सर्व उपासना त्या त्या शक्तीचे फल देणाऱ्या आहेत; पण

त्या उच्चनीच नसून सारख्याच उदात्त आहेत इतकेंच नव्हे, तर या भिन्न उपासना करणाऱ्यानीं आम्हीं एक्याच परमेश्वराच्या विशिष्ट शक्तीची उपासना करितों अशी भावना नेहमीं जागृत ठेविली पाहिजे, तर त्यांस परमेश्वर प्राप्ती होईल. नाहींतर देवतांचा भिन्न आग्रह धरून उपासना करणारे त्या त्या देवतेलाच पोंचतील, मला पोंचणार नाहींत असे भगवद्गीतेत भगवंतानीं स्पष्ट सांगितलें आहे. तेव्हा उपास्यानाम् म्हणजे उपासनेच्या देवतांचा अनियम हिंदुधर्मांत आहे हे खरें व तो युक्तही आहे. कारण भिन्न प्रकृतीनुसार किंवा भावनेनुसार किंवा कामनेनुसार उपास्यदेवता भिन्न असावी यात फायदाच आहे; पण हिंदुधर्मांत ईश्वर एकच मानलेला आहे आणि या अनेक उपास्यदेवता एकाच ईश्वराचीं रूपे आहेत अशी कल्पना जागृत ठेविल्यानें भिन्न भिन्न पंथाचा जो हिंदुधर्मांत द्वेष दृष्टीस पडतो तो नाहींसा होईल; इतकेंच नव्हे, तर उपासनेचें खरे फळ तेव्हांच मिळेल हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें.

हिंदुधर्माच्या लोकमान्यानीं सांगितलेल्या वरील ३ तीन तत्त्वांशिवाय आणखी एक चवथे महत्त्वाचे तत्त्व हिंदुधर्मांत प्रतिपादिलेले आहे तें अन्य धर्माहून विशिष्ट आहे आणि ते अत्यंत महत्त्वाचें असून तर्कास विशेष पटणारें आहे. हे तत्त्व म्हणजे कर्मानुसार आत्म्याचें निरनिराळ्या योनींतून संसरण. मनुष्यास आत्मा आहे;हा आत्मा मेल्यावर त्याचें काय होते,हा कोठून आला, त्याचे स्वरूप काय, त्यास भिन्न भिन्न सुखदुःखें कां होतात, या प्रश्नांचीं उत्तरें हिंदुधर्मानें वरील महासिद्धांतात दिलीं आहेत. आत्मा हा परमेश्वराचाच अंश आहे तो हजारो योनींतून कर्मानुसार फिरत असतो. कर्म अनादि आहे. संचित कर्मांप्रमाणे या देहांत सुखदुःखे प्राप्त होतात अभुक्त संचित व क्रियमाण कर्मानुरुप आत्म्यास पुन्हां निरनिराळ्या योनींत जन्म घ्यावा लागतो. आणि सर्व कर्मांचा नाश झाला म्हणजे आत्म्यास मुक्ति मिळते. अशाप्रकारचा सिद्धांत उपनिषदानीं प्रतिपादिलेला आहे. व तो पुढील आचार्यांनीं विस्तृतरीतीनें प्रतिपादन करून तर्कशुद्ध कसा आहे, हे दाखविलें आहे. जैन व बौद्ध लोक जरी वेदास मानीत नाहींत तरी इंद्रादि देव मानतात. पण याहून मुख्य गोष्ट ही कीं, ते हा कर्मसिद्धांत पूर्ण-

पणे मानातत यामुळेच ते हिंदु आहेत यात संशय नाहीं. कारण हा कर्म-सिद्धांत हिंदु धर्मांतच मानलेला आहे, इतर धर्मात नाहीं. उदाहरणार्थ, ख्रिस्ती धर्म असे मानतो कीं, निरनिराळे आत्मे परमेश्वरांनीं उत्पन्न केलेले आहेत. हे आत्मे केवळ मनुष्यदेहातच आहेत. मनुष्यदेहांत जीं कर्में होतात. त्या कर्मांचे फळ ईश्वर न्याय करून त्यास देईल तोपर्यंत, हे आत्मे थडग्यात पडून राहातात. मनुष्याच्या कर्माच्या बरेवाईटपणाप्रमाणे शेवटीं स्वर्ग किंवा नर्क मनुष्याच्या आत्म्यास मिळेल, अशा प्रकारचा सिद्धांत ख्रिस्ती धर्माचा आहे, आणि जवळजवळ मुसलमानी धर्माचाही हाच सिद्धात आहे. या दोन सिद्धांता-पैकीं खरा सिद्धात कोणता आहे हे सागणे अशक्य आहे. तथापि हिंदुधर्मां-तील कर्मसिद्धांत तर्कास जास्त पटणारा आहे असें आपल्यास पुढील विवेचना-वरून दिसून येते. निदान हिंदुधर्मियाना तरी तसे पटल्यावाचून राहणार नाहीं.

'वैषम्यनैर्घृण्यप्रसंशात्' असे एक सूत्र बादरायणाचे आहे. यांत कर्मसिद्धाताचे थोडक्यात कारण सांगितलेलें आहे. ईश्वराने आत्मे निरनिराळे उत्पन्न करून त्यास ससारात निराळे सुखदु:ख भोगावयास लाविलें असे मानलें असतां, ईश्वराकडे, वैषम्य आणि नैर्घृण्य असे दोन दोष येतात. लहान मोठा, श्रीमंत गरीब, सद्गुणी दुर्गुणी, इत्यादि विषम स्थिति मनुष्यांत कां असावी ? सर्वच ईश्वराची लेकरें आहेत तर सर्वांसच ईश्वरानें सुखी आणि सद्गुणी कां केलें नाहीं ? मनुष्य वाटेल तें करण्यास मुखत्यार आहे, म्हणजे त्याला कर्म-स्वातंत्र्य आहे, आणि तो आपल्या इच्छेप्रमाणे चांगले वाईट करतो, आणि सुखदु:ख भोगतो, असें कोणी म्हणेल तर ते या संसारांत प्रत्यक्षत: खरें आहे. पण तत्त्वत: तें तर्कास पटणारें नाहीं. कारण एक तर मनुष्याची जन्मत:च स्थिति विषम असते. कोणी गरीब, कोणी श्रीमंत, कोणी सुरूप, कोणी कुरूप, कोणी अशक्त, कोणी सशक्त, अशी जी भिन्न स्थिति असते, ती या जन्मीच्या कोणत्याही कर्मानें आलेली नसते. ती पूर्वजन्मीच्या कर्मानें आली असेच म्हणावें लागतें किंवा ईश्वराने त्यांस तसें निर्माण केलें असें म्हणतां येईल. पण असें म्हटलें असतां ईश्वराकडे पक्षपात, निर्दयपणा, स्वच्छंदी-पणा, इत्यादि दोष येतात, हें जन्माच्या वेळच्या स्थितीचें झालें. यापुढें मनुष्य

बरें वाईट करतो तें करण्यास तो स्वतंत्र आहे हें खरें, पण तसें तो आपल्या स्वभावानुरूप करतो, हा स्वभाव त्यास जन्मतःच असतो. तेव्हां अशा प्रकारचा भिन्न स्वभाव त्याचा का असावा? ईश्वरानें त्यास तसा दिला असे म्हणावे तर ईश्वराकडे पुन्हा वरील दोष येतात. तात्पर्य मनुष्याचे जे उच्च-नीच स्वभाव व स्थितिभेद असतात ते पूर्वकर्मानुसार असतात असे मानणे तर्कास अनुसरून आहे.

पूर्व जन्म आहे असें मानलें म्हणजे पाठुढें दुसरा जन्म आहे असे साहाजीक प्राप्त होते. शिवाय या जन्मांत जे बरें वाईट केले जाईल त्याचें फळ या जन्मात मिळतेच असेंही आपल्यास दिसत नाहीं. कित्येक दुराचारी माणसें मरेतोपर्यंत वैभव भोगतांना आपण पाहातों आणि कित्येक सद्गुणी, सदाचरणी लोक दु.ख भोगीत असलेले दृष्टीस पडतात. अर्थात् पाप कृत्याचे किंवा पुण्य कृत्याचें फळ नेहमीं या जन्मात आलेलें दिसत नाहीं. ते फळ केव्हां तरी पुढें आलें पाहिजे. तें बहुधा लवकरच पुढच्या जन्मात मिळावे, असे मानणें जास्त सयुक्तिक दिसतें. खिस्ती धर्मात मानल्याप्रमाणे, लाखो वर्षांनंतर न्यायाचा दिवस येईल, त्या वेळेस न्याय होऊन हें फळ मिळेल असें मानावें तर या पापपुण्याचें फल येण्यास फारच काला-वधि लागेल, आणि तोंपर्यंत दोन्ही आत्म्यांची स्थिति एकच राहाणार. तात्पर्य हिंदुधर्मांत मानलेला कर्मसिद्धांत, अनेक दृष्टीनें तर्कास पटणारा आहे आणि ईश्वरावर वैषम्य नैर्घृण्य, इत्यादि दोष या सिद्धांतानें येत नाहीं.

या कर्मसिद्धांतावर महत्त्वाचा आक्षेप असा येतो कीं, पूर्वजन्मांचें फळ आपण या जन्मीं भोगतों असें मानिलें तर, पूर्वापूर्व जन्म पाहातां सृष्टि-उत्पत्तीच्या वेळीं तरी, पहिला जन्म मानावा लागेल आणि त्या जन्मांत केलेलें कर्म प्रथम मानावे लागेल. अर्थात हें कर्म भिन्न कां झालें आणि ईश्वरानें करविलें, तर त्यावर प्रारंभीं तरी वरील दोष येतात. या आक्षेपाचे उत्तर वेदांत-शास्त्रांत असें दिलें आहे कीं, प्रारंभींचा जन्मच नाहीं. संसार अनादि आहे आणि त्याचप्रमाणें कर्मही अनादि आहे. सृष्ट्युत्पत्ति हिंदुधर्मांत जरी मानलेल

आहे, तरी त्यांत ही उत्पत्ति मागील सृष्टीचे कर्म घेऊन पुन्हां पुढे सुरू होते, असे वेदांतशास्त्रांत सांगितले आहे. भगवद्गीतेंत दिवस आणि रात्र यांचा दृष्टांत घेऊन प्रभवत्यहरागमे रात्र्यागमे प्रलियंते अशा रीतीने हा विषय सुगम केला आहे. तात्पर्य, कर्म अनादि आहे असे हिंदु धर्माचे मत आहे. ते तर्कास सोडून नाहीं असे थोडासा विचार केला असतां दिसून येईल. जर ईश्वर अनादि आहे तर कर्मही अनादि मानण्यास हरकत नाहीं. सृष्टीची उत्पत्ति व लय हे चक्रासारखे अनादि चालले आहे ते प्रथम अमुक वेळीं चालू झाले असे मानणे शक्यच नाहीं, तेव्हा कर्मंहि अनादि मानण्यास हरकत नाहीं. असो. तर हा कर्मसिद्धांत हिंदुधर्मांचा एक महत्त्वाचा विशेष आहे एवढे सांगून ही लेखमाला पुरी करूं.



# पोंच व अभिप्राय

**रंगपंचमीचा पोवाडा**—(रचणार–ह. भ. प. दास गणु–प्रकाशक रा. गणेश अनंत सराफ, श्रीदत्त मुद्रणालय, नांदेड, किंमत ४८) प्रकाशकानीं पोवाडा आमचेकडे अभिप्रायार्थ पाठविला त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोत. ह. भ. प दास गणू व त्यांची कविता श्रीसाई लीलेच्या वाचकांना तरीं अपरिचित नाहीं. याच प्रकाशकांनीं त्याचीं 'स्फुट पदे' पुस्तकरूपानें पूर्वी प्रसिद्ध केलीं आहेत व त्यावर श्रीसाई लीलेत ( व. ४ अं. ८ ) आम्हीं विस्तृत अभिप्राय दिला आहे. त्याशिवाय मधून मधून श्रीसाई लीलेतही त्यांची रसाळ कविता प्रसिद्ध झाली आहे, त्यावरून त्याची काव्यप्रतिभा किती उज्ज्वल आहे याची आमच्या वाचकाना ओळख असल्यामुळें आम्हीं त्याची पुनरोक्ति करीत नाहीं. आजपर्यंत ह. भ. प. दास गणू बुवाच्या काव्याचे विषय, संत चरित्रे, ईश्वर गुणवर्णन अशा तऱ्हेचे आपल्या पाहाण्यांत आले आहेत. परंतु प्रस्तुत काव्याचा विषय त्याहून अगदीं भिन्न आहे. तो ऐतिहासिक आहे व त्यांतही त्यांच्या काव्याची ओजस्विता तितकीच उज्ज्वल दिसून येते. काव्याचा विषय श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यानीं खेळलेला रंग हा घेतला आहे. पोवाड्याला जरी 'रंगपंचमीचा पोवाडा' अशी संज्ञा दिली आहे तरी फाल्गुन शुद्ध पंचमीला खेळलेला हा रंग नसून—

**शके सत्राशें पंधरा सालीं प्रमादि संवत्सर असतां ।**
**चैत्र शुद्ध प्रतिपदा तिथीसी रवि माध्यान्हां प्रति येतां ॥**

**शहर पुण्यामधें आनंद झाला रंग उडाला अनिवार ।**
**रहात्या वाड्यामधें भरविला श्रीमंतांनीं दरबार ॥**

असें कवीनींच आपल्या काव्यांत सांगितले आहे. नुसता 'गुढीपाडव्याचा दरबार' किंवा 'दरबारचा पोवाडा' असे नांव दिलें असतें तर त्यावरून त्या-

दिवशीं खेळलेल्या रंगाची कल्पना झाली नसती, म्हणून 'रंगपंचमीचा पोवाडा' हे नाव कदाचित् दिले असावे. परतु हा त्यात एक दोषच आहे. पाटऱ्याला दरबार का भरविला त्याचे कारण,

पाटिल बाबा महादजी शिंदे पदवि अलीजा बहादर ।
महा मुत्सद्दी फडणिस नाना बृहस्पतीचा अवतार ॥
या दोघांनीं करुन मनसुबा बेत ठरविला रंगाचा ।
रंगमिषें मेळाच जमविला दख्खनच्या सरदारांचा ।

कवीनीं याप्रमाणे दिलें आहे.

काव्याचा विषय ' **कथाही वर्णित बखरींत वाचुन** ' कवीनीं घेतला आहे. पोवाडयाचे दोन भाग पाडले आहेत. पहिल्या भागांत पांच कडव्यात, श्रीमंतानीं रहात्या ( शनवार )वाडयात दरबार भरवून तेथून थाटाने स्वारी निघाली व ती वाडयाला उजवी घालून, रंग खेळत व गुलाल उधळीत बुध-वार पेठ, रविवार पेठ, रास्त्याची पेठ या रस्त्यानें वानवडीस महादजी शिंदे यांचे गोटांत गेली; तेथें दरबार भरून शिंद्याचा अहेर घेतला, रंग झाला, व हारतुरे घेऊन अस्तमानी शहराकडे मोर्चे फिरले, याचें रसभरित वर्णन दिले आहे. जुन्या बखरी अलीकडे कोणी फारसे वाचीत नाहीं व त्या मिळतही नाहींत. परंतु अशा तऱ्हेचें छोटें काव्य वाचून मूळ बखरींत किती बहारीचे वर्णन असेल याची कल्पना होते. ' ये कांडे, होळार ' ( वाद्य वाजविणारे ) ' चिराफदानी ' वगैरे आता लुप्त झालेले जुने शब्द माहीत होतात; त्या वेळेस प्रसिद्ध सरदार कोण होते त्यांची जंत्री मिळते; ब्राह्मणमराठयांत एकोपा किती होता तो पहाण्यास सांपडतो; अलीकडचे ' मर्द ' मराठे, ब्राह्मणाना ' भटें ' म्हणून हिणवितात परंतु त्यांचे महादजी शिंद्यासारखे दिलदार शूर पूर्वज त्यांच 'भटां'पुढें ' **कर बांधुनिया दस्तीनें कुर्निसात** ' करीत असत व ते वरवर नसून प्रेमाने त्यांचे नेत्र